# ९. शुद्ध बीजापोटी

– रेखा बैजल

रेखा बैजल (जन्म : १९५२)

महत्त्वाच्या कथा लेखिका. मराठी-हिंदी दोन्ही भाषांमधून लेखन. कथा, कादंबरी, नाटक, कविता, विज्ञानकथा, चित्रपटकथा, ललितलेखन, एकांकिका असे वैशिष्ट्यपूर्ण लेखन. 'अशब्द', 'आदिम' हे कथासंग्रह. 'किडनॅपिंग' व 'क्लोन' हे दोन विज्ञान कथासंग्रह, 'अज्ञेय', 'जलपर्व', 'तृप्ता', देवव्रत, 'प्रस्थान' व 'प्रलयंकार' या कादंबऱ्या, 'स्वतःतून उगवताना' हा कवितासंग्रह इ. महत्त्वाची साहित्यसंपदा प्रकाशित. २०११ मध्ये परभणी येथे भरलेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या दुसऱ्या मराठवाडा लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा.

'शुद्ध बीजापोटी' ही एक विज्ञानकथा आहे. वैज्ञानिक जाणिवा रुजवत कल्पित वास्तवातून आगामी काळातील संशोधनावर भाष्य करतात. हिमोफिलिया (बहु रक्तस्राव) नावाच्या अनुवांशिक आजाराने ग्रस्त असणाऱ्या विवाहित नेहाला विज्ञानातील नवनवीन शोधप्रयोगामुळे मातृत्वसुखाची प्रचिती येते. निःसंतानास विज्ञानातील शोध कसे वरदान ठरतात असा सकारात्मक संदेश देणारी ही कथा आहे.

वाढदिवसाचा आनंद लहानशा पिंटूच्या चेहऱ्यावर अगदी फुलून आला होता. नेहाही कौतुकानं आपल्या लाडक्या लेकीकडे पाहात होती,

"चला पिंटू, आता केक कापायचा..."

पिंटून लहानश्या हातानी केक कापला. आणि दोन मेणबत्या विझवल्या वाढदिवसांच्या शुभेच्छांच्या गजरात.

"चला आधी डॉक्टर काकांना हा केक..." नेहानं त्याला माझ्याकडे आणत म्हटलं.

"अगं... आधी मुलांना..."

"नाही काका, खरा मान तुमचाच आहे. तुमच्या मुळेच माझा पिंटू..."

नेहानं बोलता बोलता वाक्य अर्धवट ठेवलं. आणि केवळ माझ्याकडे पाहिलं. तिची ती कृतज्ञ दृष्टी... मी तिच्या डोक्यावर हात ठेवला.

तेवढ्यात पिंटूनं इवल्याशा हातांनी माझ्या हातावर केक ठेवला.

त्यांच्या साठी आणलेला मेकॅनो मी त्याच्या हाती दिला.

पिंटू पुढे झाला आपल्या मित्रांच्या घोळक्यात शिरला.

"काका... थांबा हं मी डिशेस आणते..." म्हणत नेहा आत गेली.

आणि तेवढ्यात काही खळकनं फुटल्याचा आवाज आला. पाठोपाठ पिंटूचं रडणं कानी आलं.

नेहा ही बाहेर धावत आली. "काय झालं पिंटू?..."

पिंटूच्या हातातली केकची डिश खाली पडून फुटली होती आणि त्याचा एक



Scanned with OKEN Scanner

ओरखडा त्याच्या पायावर उमटला होता. रक्ताचे थेंब त्यातून तरारून आले होते.

"नेहा आयोडीन आण...आणि बँडेज... माझ्यातला डॉक्टर पटकन म्हणाला.

"होय काका, अजय... तू पिंटूकडे बघ, मी आलेच..."

नेहा लगबगीने आत गेली. आयोडीन घेऊन आली.

नेहमीच्या थयथयाटात आयोडीन लावून झालं. जखमेवर नेहानं बँडेज लावून टाकलं.

पिंटूचं रडणं संपलं. तो खेळण्यात गुंगला. नेहा डिशेस आणण्यात आणि मी... मी दोन वर्षापूर्वीचा भूतकाळ आठवत होतो.

आज नेहानं पिंटूच्या जखमेवर केवळ आयोडिन लावलं. थोड्या वेळात जखमेतून रक्त येण्याचे थांबलं. एक साधी क्रिया. प्रत्येकांत होणारं ब्लड क्लॉटिंग आणि त्यामुळे जखमेतून वाहणारं रक्त थांबणं... पण पिंटूच्या बाबतीत ही साधीशी क्रिया अशक्य ठरली असती. आणि एक छोटीशी टाचणी टोचून होणारी जखम ही जीवघेणी ठरली असती जर मी तो प्रयोग केला नसता तर... दोन वर्षापूर्वीची नेहाची भेट मला आठवत होती.नेहा माझ्या इन्स्टिट्यूट मध्ये आली होती.

"मी नेहा, अरविंद जोशीची मुलगी" त्या तरतरीत मुलीनं स्वतःची ओळख करून दिली.

"आणि हे माझे मिस्टर...अविनाश..."

पण नेहाच्या ओठून अरविंदच नाव निघालं आणि मी आनंदीत झालो.

अरविंद माझा क्लासमेट. दोघांनी ही वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलं. तो एम.डी. करून एका चांगल्याशा गावात प्रॅक्टीस करायला लागला होता. आणि मी मात्र संशोधनासाठी स्वतःला वाहून घेतलं होतं. जेनेटिकल इंजिनिअरींग इन्स्टिट्यूट मध्ये माझं स्वतःच असं स्थान निर्माण झालं होतं. मी करत असलेल्या संशोधनासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा मला देण्यात आली होती. मानवी पेशीतली गुणसुत्रे म्हणजेच क्रोमोझोम्स व त्या क्रोमोझोम्स वरील जीन्स हा माझा संशोधनाचा विषय होता. निरनिराळे जीन क्रोमोझोम्समधून वेगळे करता येणं... नवा जीन त्या क्रोमोझेन वर Implant करणं आणि मुख्यत्वे अनुवंशिक रोग बाळगणाऱ्या जीन्सचा अभ्यास करणं हे माझे अभ्यासाचे विषय होते. त्या संशोधनात मी रमलो ही होतो. इतका रमलो होते की आज अरविंदची मुलगी माझ्यासमोर येऊन उभी राहिली तेव्हा मधे हा एवढा मोठा काळ गेला आहे ह्याची मला जाणीव झाली.

"काय म्हणतोय अरविंद?" मी विचारलं. आणि त्या प्रश्नासरशी तिच्या डोळ्यात पाणी आलं.

"आई पपा आणि माझा भाऊ एका कार ॲक्सिडेंट मध्ये गेल्याच वर्षी..."

"ओ... आय ॲम सॉरी नेहा..."

माझेही डोळे डबडबून आले होते.

"पपा नेहमी तुमची आठवण काढायचे. एक हुषार सायंटिस्ट म्हणून तुमच्या बद्दल कौतुकाने बोलायचे खूपदा भेटावसं वाटायचं त्यांना. पण ते प्रॅक्टिस मध्ये अडकलेले... तुम्ही ही busy"



Scanned with OKEN Scanner

"खरंय नेहा. मनं एकमेकातं गुंतलेली होती पण भेट मात्र नाही झाली कधी "

"माझे दीड वर्षापूर्वीच लग्न झालं आणि आता नुकतेच आम्ही इथे बदलून आलोत. तुम्हाला भेटावं असे प्रकर्षानं वाटलं. पपांच्या बोलण्यात येणारे रमेश काका कसे आहेत ते पाहावं वाटलं..."

मी आता मात्र न राहवून तिच्या माथ्यावरून हात फिरवला.

"बेटा... बघ.. नातं बांधलस आपल्या दोघात. आता ह्या नात्याचा कधी अनमान करू नकोस, ह्या काकांच घर तुझ्यासाठी आता माहेर आहे."

"काका..." नेहा केवळ एवढंच उच्चारू शकली.

आणि त्यानंतर नेहा आणि अविनाशच्या अनेकदा भेटी झाल्या पण प्रत्येक भेटीत मला नेहाच्या डोळ्यात एक वेदनेचा गडदपणा दिसायचा. काही दुःख तिला डाचतंय हे माझ्या लक्षात येत होते... आणि एक दिवस गप्पांच्या ओघात मी तिला न राहवून म्हणालो.

"नेहा... तुला कसली काळजी आहे ? कसलं दुःख आहे ? बेटा जे घडलं ते घडलं पण आता ते विसर. तुझ्या पुढे मोठ आयुष्य पडलं. अविनाश तुझ्या सोबत आहे. माझा सल्ला ऐक, लवकर एक मुल होऊ दे... तुला ते मुल दुःखातून सावरेल."

मी एवढं म्हटल मात्र नेहा जणूं उन्मळून गेली.

"नाही काका एवढं मला नका सांगू..."

"काय झालं ?"

रडणाऱ्या नेहाच्या पाठीवरून अविनाश हात फिरवत होता.

"नेहा, स्वतःला सावर... अगं तुला मुलासाठी एवढं वाईट वाटतं तर आपण एखादं अनाथ मूल दत्तक घेऊ..."

अविनाशचे हे बोलणं ऐकून मी आश्चर्यचकित झालो.

"अनाथ मूल दत्तक ? का अविनाश तुम्ही दोघं एवढे हेल्दी..."

"नाही काका...मी ...मी एक विषवल्ली आहे."

"नेहा काही तरी बोलू नकोस..." अविनाशनं काहीस रागानं म्हटलं.

"विषवल्ली ? मला सांगशील तुला काय त्रास आहे तो ?"

"काका मी हिमोफिलियाची कॅरिअर आहे..."

"माय गॉड ! हिमोफिलिया ? पण अविनाश तर नॉर्मल होता."

"होय काका. पण माझी आई हिमोफीलियाची कॅरिअर होती. "

"हं..." मी विचारमग्न झालो. नेहाच्या डोळ्यातल्या वेदनेचं कारण कळालं होते.

हिमोफीलिया सारखा भयंकर अनुवंशिक रोग नेहाच्या रक्तात वस्ती करून होता. रक्त गोठण्याची क्रिया एक अत्यंत महत्त्वाची आणि जीव वाचवणारी क्रिया असते. कुठेही जखम झाली की काही वेळ रक्त वाहतं आणि हळूहळू रक्तातल्या फायबर्स मध्ये रक्त पेशी अडकत जाऊन रक्त वाहणं थांबतं. पण हिमोफीलिया सारख्या रोगात मात्र ही रक्त गोठण्याची क्रियाच होत नाही. आणि केवळ लहानशी जखम हिमोफीलियाच्या पेशंटसाठी प्राण घातक सिद्ध होते.

"म्हणजे तू मुल होऊच देणार नाहीस ?"

"होय काका, कारण मुलगा झाला तर तो हिमोफिलियाचा सफरर असेल. आणि मुलगी झाली तर ती कॅरिअर असेल. माझ्या सारखी. मी म्हणून हा विषवृक्ष इथेच



Scanned with OKEN Scanner

संपवायचा ठरवला आहे. काका माझ्या भावाचा त्रास मी माझ्या डोळ्यांनी पाहिला आहे. थोडं खरचटलं की एवढं रक्त जायचे की त्याला रक्त द्यायची वेळ यायची. तेही देणं डेंजरस. एवढासा लागलेला मुका मार त्याच्यासाठी त्रासदायक ठरत होता. आईबाबा तर अक्षरक्षः डोळ्यात तेल घालून त्याला जपत होते. पण ते ही दुःख आता संपल. ॲक्सिडेंट मध्ये माझ्या भावाला लहानशी जखम झाली पण तिच्यातल्या अतिरक्तस्त्रावाने तो गेला. मूल म्हटलं की मला त्याचा त्रास आठवतो. आईच दुःख आठवतं. पपांची काळजी आठवते. म्हणून मी मूल होऊच देणार नाही. आणखी एका जीवाला मला दुःखात ढकलायचं नाही."

नेहा आवेगानं बोलत होती पण मी मात्रं अंतर्मूख झालो. मला मी करत असलेला प्रयोग आठवून गेला आणि त्याच वेळी मला जाणवून गेलं की आपण नेहा साठी नक्कीच काही तरी करू शकू. पण त्यावर आणखी थोडा विचार करायला हवा. आणि मग नेहाला आणि अविनाशला आपण तो प्रयोग समजावून सांगायचा. मी त्या विचारांमध्येच उठलो.

"हे काय काका... एकदम उठलात..."

"नेहा मला एक महत्त्वाचं काम आठवलं आहे. मी तुला उद्या फोन करीन."

"का ?" नेहाने आश्चर्याने विचारलं.

"उद्याच सांगीन मी ते... ओ.के..."

नेहाला आणि अविनाशला संभ्रमात ठेऊन मी माझ्या इन्स्टिट्युट मध्ये परतलो.

आणि त्यानंतर जवळ जवळ रात्रभर मी करत असलेल्या प्रयोगाच्या नोटस् आणि मी. वाचन विचार आणि नेहा-तिच्या डोळ्यातली वेदना... केवळ एवढंच माझ्या डोक्यात होतं.

सकाळी नेहाला फोन लावला. फोनची घंटी एकदाची वाजली...अन् फोन उचलला गेला.

"नेहा"

"होय काका, मी फोनपाशीच बसून होते..."

"नेहा तू आणि अविनाश मला आता भेटायला या. आज त्याला रजा टाकायला सांग.."

"का ?"

"ते इथं आल्यावर सांगीन. फक्त आता या क्षणी तुम्ही निघा."

खरं तर नेहापेक्षाही मी उत्सुक होतो. मला उत्सुकता दोन प्रकारे होती. एक तर नेहाला मूल होणे महत्त्वाचे होतं आणि दुसरं म्हणजे माझ्यातला सायंटिस्ट हा प्रयोग कितपत यशस्वी होतो हे पाहण्यासाठी उतावीळ होता.

थोड्याच वेळात नेहा व अविनाश येऊन पोहोचले.

"या" मी त्याचं स्वागत केलं.

नेहा उताविळीनं बेचैन झालेली.

"नेहा... अविनाश... तुम्ही दोघांनी हिमोफिलीयाच्या भीतीमुळे मुल न होण्याचा निर्णय घेतला आणि तो योग्य निर्णय होता. पण मी जो प्रयोग सध्या करतो आहे. त्यामुळे तुम्हाला कोणताही डिफेक्ट नसलेलं मूल होऊ शकेल."

"काय काका ?"

"काय ? खरच काका..."



Scanned with OKEN Scanner

"होय नेहा.

"ते कसं काय ?..." अविनाशनं विचारलं.

"मी तुम्हाला प्रयोग समजावून सांगतो. अनेक अनुवंशिक रोग हे माणसांच्या पेशीत असणाऱ्या क्रोमोझोम वरील जीन्स मधून या एका पिढीतून दुसऱ्या पिढीत वाहून नेले जातात. आणि माझ्या संशोधनाचा विषय हाच आहे."

"मी जी पाहणी केली, निरनिराळी ऑब्झर्व्हेशन्स घेतलीत तेव्हा माझ्या लक्षात आलं की गर्भधारणेच्या वेळचा प्रत्येक संयोग झालेले ह्याला ओव्हम किंवा फलित बीज म्हणूया आपण... हे त्या अनुवंशिक रोगांना वाहून नेणारा जीन बाळगून असतं. हा असा डिफेक्टीव्ह जीन ओळखता येतो. पण प्रत्येक वेळी हा असा दुषित जीन त्यात असतोच असं नाही. अनेकदा निर्व्यंग मूल ही जन्माला येऊ शकतं. पण हे क्वचितच घडतं...."

नेहा ते ऐकता ऐकता पुनः निराश झाली.

"डॉक्टर काका, म्हणजे हे पुन्हा रिस्क घेणंच झालं नाहीका ?"

"अजिबात नाही नेहा. नेहा, तुझ्यातला जो ओव्हम सुदृढ असेल तेच आपण वाढवायचा."

"पण असं सुदृढ ओव्हम तुम्ही ओळखणार कसं ?" अविनाशनं विचारलं. "तो एक मोठा प्रोसेस आहे अविनाश अगदी पहिल्या पासूनच तुम्हाला सांगतो. मासिक पाळीच्या साधारण चौदाव्या दिवशी मॅचूअर झालेले बीज बीजकोषातून फोलोपीन ट्युबमध्ये येतात. हे बीज बाहेर पडताना सोनेग्राफीतून बघता येतं. एकदा हे बीज बीजकोशातून फेलोपीन ट्युबमध्ये आलं की मिडल लेप्रेस्कोपने बीज व त्या भोवतीच द्रावण बाहेर काढलं जातं. ते बीज प्रयोगशाळेतल्या पेटीडिशमध्ये ठेवलं जातं. त्यांच पेटीमध्ये तुझे स्पर्मस् म्हणजे शुक्राणु टाकले जातील. त्या डिशला विशिष्ट टेंपरेचर मध्ये ठेवले जातं. तेवढं टेंपरेचर शरीराच्या आत असतं तेवढ्या तापमानातं काही केमिकल्समध्ये बीज व शुक्राणु ठेवले जातात. नैसर्गिक क्रियेनुसार शुक्राणु त्या ओव्हमवर हल्ला करतात. काही शुक्राणुं त्याचं कवच फोडतात. आणि ते बीज ह्यांचा संयोग होतो. बीज फलित होतं. इथवरची सर्व क्रिया टेस्ट ट्युब बेबीसाठी कराव्या लागणाऱ्या क्रियेसारखीच आहे. आपल्या प्रयोगाच वेगळेपण ह्या पुढच सुरु होतं."

"ते कसं...?.."

"हे जे फलित बीज आहे ते साधारणपणे दोन तीन दिवसात सात ते आठ पेशींमध्ये वाढतं. ह्या स्थितीला आम्ही Eight Cell Stage म्हणतो. एकदा ही स्टेज आली की त्या एंब्रियोतली केवळ एक पेशी सूक्ष्म दशदर्शी ट्युबने (Microscopically Thin Tube)" ने काढून घेतली जाते.

"आणि मग ही पेशी आम्ही सूक्ष्मदर्शकाखाली विभाजित करुन तिचं परीक्षण करतो. त्यातले क्रोमोझेम्स वेगळे काढले जातात आणि त्या क्रोमोझोम्सचे परीक्षण केल जातं. ह्या क्रोमोझोम्स वरच अनेक जीन्स असतात. हे जीन्स म्हणजे दुसरं तिसरं काही नाही तर माणसांच सुक्ष्म प्रतीक असतं. त्याचा रंग, त्यांच लिंग त्याचा स्वभाव, त्याची हुषारी त्याचं आरोग्य हे सर्व ते जीन्स ठरवतात. आणि सुदैवाने सर्व जीन्सची क्रोमोझोमवरची स्थान आम्ही निश्चीत करु शकलो आहोत. त्यातला अनुवंशिक रोग वाहक जीन कोणता हे देखील आम्ही ओळखू शकतो. जर त्या पेशीतील जीन अनुवांशिक रोग वाहक असेल तर तो



Scanned with OKEN Scanner

आठ पेशीय फलितासाठी कुचकामी ठरतो. पण सुदैवाने जर तो जीन त्यात आला नसेल तर हा एब्रियो पुनः आईच्या गर्भात ट्रान्सप्लांट केला जातो. आणि एक सशक्त मूल जन्माला येते."

मी हे सगळं सांगत होतो. ऐकता ऐकता नेहाचा चेहरा फुलून उठत होता.

डॉक्टर काका, हे जे तुम्ही सांगताय ते माझ्या बाबतीत शक्य होईल ?"

"होय नेहा तुला एक सुदृढ मूल निश्चित होईल. एका शास्त्रज्ञाचा हा आशीर्वाद आहे. तो खोटा ठरणार नाही."

नेहाचे डोळे आता भरून आले होते.

"काका. मला लवकर मूल हवंय..."

मला हसू आलं.

"हो, बेटा पण आता आपल्याला सर्व टेक्निकल प्रोसेस मधून जावं लागेल. तुला पिरिएड येणं. त्या नंतरचा चौदावा दिवस..."

स्वतःच्याच उताविळीवर मग मात्र नेहाला हसू आलं. आपले अश्रू पुसत हसत ती म्हणाली.

"बघा काका कसं माणसांच मन असतं ! आजवर मी मूल होऊ द्यायचं नाही असं ठरवलं होत. आणि आज तुम्हीही मला आशेचा किरण दाखवलात. आणि मला त्या क्षणी त्या स्वप्नांची ओढ लागली."

"ते स्वप्न तुझ खरं ठरणार आहे नेहा" न राहवून नेहा माझ्या पायाशी वाकली...

त्यानंतरचा एक दिवस. नेहा व अविनाश माझ्या लॅबमध्ये आले. नेहाची सोनाग्राफी मी स्वतः करत होतो. आणि तो एक क्षण नेहाच्या ओव्हरीतून फर्टइल एबियो बाहेर पडण्याचा क्षण आणि मी पाहत होतो. दोन फर्टाइल एब्रियोत बाहेर पडले.

न रहावून मी उद्गारलो.

"वा."

"काय झालं ?" बाजूला उभ्या असलेल्या अविनाशनं विचारलं.

"अविनाश, देव आपल्या मदतीला धावून आला बघ. एका ऐवजी दोन एंब्रियोज मॅच्युअर होऊन बाहेर पडलेत. म्हणजे नॉर्मल कोर्स मधे नेहाला जुळं झालं असते. पण आपल्या प्रयोगासाठी हे एक चांगलं लक्षण आहे. बीज चांगलं आहे की वाईट हे पाहायला आपल्याला दोन एंब्रियोज मिळाले आहेत. दोनपैकी एक एब्रियो नॉर्मल असेल असं आपण गृहीत धरूया."

त्यानंतर ते एंब्रियोज पेट्रीडिश मधे काढणं,त्यांना फलित करणं, त्याचं आठ पेशीय स्थितीत येणं ही सर्व प्रक्रिया झाली.

आता मात्र ती अस्वस्थ झाली.

ह्या दोन एंब्रियो पैकी एक एंब्रियोतरी योग्य असेल ना ? की आणखी काही महिने नेहाला सतत ह्याच प्रक्रियेतून जावं लागेल ?

ह्या क्षणी माझ्यातला सायंटिस्ट वात्सल्याच्या आहारी जाऊ लागला होता.

पेट्रीडिशमधल्या एका एंब्रियोची पेशी मी सूक्ष्मदर्शीट्युबने उचलली. मायस्क्रोपखाली ठेवली. त्या इवल्याशा पेशीतले क्रोमोझोम्स, त्यावरचे जीन्स न्याहाळले आणि निराशेने मी ती स्लाईड बाजूला ठेवली. नागांन फणा काढावा, तसा हिमोफिलियाचा

जीन त्या क्रोमोझोमवर स्पष्ट दिसत होता.

काहीशा निराश अवस्थेतच मी दुसऱ्या एंब्रियोतली पेशी उचलली स्लाईडवर ठेवली. तिच्यावर सूक्ष्मदर्शक यंत्र केंद्रित केलं.

मी पाहात होतो... पुनः पुनः पाहात होतो. आणि न राहवून मी आनंदाने ओरडलो.

"अविनाश आपण जिंकलो. ही बघ ही नॉर्मल पेशी मिळाली. म्हणजे हा एंब्रियो नॉर्मल आहे. आता एंब्रियो आपण नेहाच्या गर्भाशयात सेट करू."

माझ्या पेक्षाही अविनाशंची स्थिती वर्णनातीत होती.

अखेर तो एंब्रियो नेहाच्या गर्भाशयात पुनः सुरक्षित ठेवण्यात आला. "नेहा, बघ एक लहानसं छानसं मूल सध्या तुझ्या गर्भात आहे. पण आता पूर्ण विश्रांती घ्यायची. बेड रेस्टच, कारण अशा तऱ्हेच्या गर्भधारणेत ॲबॉर्शनचे चान्सेस जास्त असतात."

नेहाने काही न बोलता केवळ माझा हात हाती घेतला आपल्या गालाला लावला. गरम अश्रू माझ्या हातावर ओघळले.

ह्या क्षणी ती निश्चित माझ्या स्पर्शात ती अरविंदचा, आपल्या पित्यांचा स्पर्श जाणवत होती."

आणि एक दिवस तिचं स्वप्न सत्यात अवतरलं.

"काका... चला न जेवायला. कसल्या विचारात गढला आहात." नेहानं मला भानावर आणलं.

"होय, चला" मी भानावर आलो. वाढदिवसाचा आनंद नुसता उसळून चालला होता. मुलं खेळत होती. आमच्या सगळ्याच्या पुढे पिंटू उड्या मारत डायनिंग टेबलकडे चालला होता.

पिंटू नाही. एक स्वप्न सत्याचे पंख लावून भिरभिरत होतं.

(विज्ञानकथा)

★ ★ ★